
प्रारंभ
२६ ऑक्टोबर २०२५
रविवार



सांगता
२० नोव्हेंबर २०२५
गुरुवार

गुरुतत्व प्रदीप,आयोजित

# श्री क्षेत्र कारंजा (लाड) ते श्री क्षेत्र गाणगापूर पालखी रथयात्रा

श्री गुरुदेव दत्त

श्रीमन् नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या आज्ञेनुसार वरील पालखी रथयात्रेचे आयोजन केले असून पालखी रथयात्रेची मार्ग तालिका मागील पानावर दिलेली आहे.

तीन वर्षापूर्वी श्री स्वामी महाराजांच्या आज्ञेनुसार गुरुतत्त्व प्रदीप या परिवाराची निर्मिती झाली. श्री गुरुचरित्र सारामृत या ग्रंथाच्या १००८ पारायणाची मालिका सुरू असून त्यातील ९वे पारायण श्रीक्षेत्र गाणगापूर येथे दि.२५ डिसेंबर २०२५ ते दि.२ जानेवारी २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्
परित्राणाय-साधूनां विनाशाय च दुष्कृताम् धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे

श्री स्वामी महाराजांनी काशी क्षेत्री संन्यास दीक्षा स्वीकारल्यानंतर त्यांचे जन्मगाव कारंजा (लाड) येथून निघून तीर्थाटन व लोकोद्धार करत श्री स्वामी महाराज गाणगापूर येथे पोहोचले, साधारणपणे त्याच मार्गाने पुन:श्च एकदा श्री स्वामी महाराज या यात्रेकरिता निघत आहेत.

श्री स्वामींच्या असीम कृपेने यात्रेच्या आयोजनाची सेवा करण्याची सुवर्णसंधी गुरुतत्त्व प्रदीप या आपल्या परिवारास प्राप्त झाली आहे.

गुरुतत्त्व प्रदीप या परिवाराच्या निर्मितीमागे श्री स्वामी महाराजांच्या मनातील मुख्यत्वे हेतू पुढील प्रमाणे आहे.

सुयोग्य गुरुभक्तीचे ज्ञान जनमानसांपर्यंत पोहोचवणे व गुरु ही व्यक्ती नसून ते एक महान तत्व आहे हा बहुमलाचा संदेश देऊन सांप्रत काळातील भक्तीचा झालेला बाजार रोखणे हा आहे. हे ईश्वरीय कार्य करण्याकरता माध्यम म्हणून श्री गुरुचरित्र सारामृत हा ग्रंथ श्री स्वामी महाराजांनी गुरुतत्त्व प्रदीपच्या हाती सोपविला आहे. विविध शहरातील व गावातील होणाऱ्या पारायण सोहळ्याच्या माध्यमातून हे कार्य मागील तीन वर्षापासून सुरू आहे. या कार्यातील अतिशय महत्त्वाचा टप्पा म्हणजे १००८ पारायण मालिकेतील ९ वे पारायण दि.२५/१२/२०२५ ते दि.०२/०१/२०२६ या कालावधीत श्रीक्षेत्र गाणगापूर येथे "लक्ष भोजन सहितम्, सिद्धग्रंथ १००८ श्री गुरुचरित्र सारामृत पारायण, श्री गुरुचरित्र कथामृत व नाम भक्ती सोहळा" आयोजित केला असून या भव्य दिव्य कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

त्रिभुवन सारे जेवू घाली , पालनपोषण सर्वा वाली, ,पंचभुते ही सृष्टी सारी , खेळे ज्यांचे हाती
मागतो भिक्षा ॐ भवती मागतो भिक्षा ॐ भवती

आजवर श्री स्वामी महाराजांच्या आज्ञेने झालेले सर्व पारायणांचे कार्यक्रम भिक्षेच्या धन, द्रव्यावर सुयोग्य रीतीने संपन्न झाले असून श्रीक्षेत्र गाणगापूर येथील हा भव्य दिव्य कार्यक्रम देखील याच माध्यमातून सिद्धीस जाणार आहे. खरेतर या पालखी रथयात्रेच्या द्वारे श्री स्वामी महाराजांना भिक्षा वाढण्याची महत पर्वणी सर्व भाविक भक्तांना लाभणार आहे. या यात्रेच्याद्वारे श्री स्वामी महाराजांचे दर्शन, अभिषेक, पूजन , आरती व भिक्षा इत्यादी सेवा करून श्री स्वामी महाराजांचे कृपा आशीर्वाद प्राप्त करून घेण्याचा जणू काही हा अमृत सिद्धी योग प्राप्त झाला आहे या पालखी रथयात्रेच्या मार्गातील विविध शहरे व विविध गावातील श्री स्वामी महाराजांचे भक्त या पालखी रथयात्रेच्या आगत- स्वागत व दर्शन इत्यादी कार्याकरिता कार्यमग्न झालेले असून या मार्गातील प्रत्येक भाविक भक्तांनी या स्वामी कार्याचा प्रचार व प्रसार करण्याच्या हेतूने हे पत्रक सोशल मीडियाच्या द्वारे आपल्या परिसरातील जास्तीत जास्त भाविक भक्तांपर्यंत पोहोचवून या ईश्वरीय कार्यात आपला बहुमोलाचा वाटा उचलून श्री स्वामी कृपेस पात्र व्हावे.

प्रत्येक गावातील व शहरातील श्री स्वामींच्या दर्शनाच्या वेळा व ठिकाण यांची माहिती त्या त्या ठिकाणचे स्वामी भक्त वेगवेगळ्या प्रकारे आपल्यापर्यंत पोहोचवतील. या पालखी रथयात्रेच्या द्वारे विविध पारायणात जाहीर झालेली धान्यरूपी भिक्षा तसेच भिक्षापात्र यांचे संकलनही करण्यात येणार असून त्या व्यतिरिक्त स्वेच्छेने कोणतेही धान्य व द्रव्य भिक्षा आपणास श्री स्वामी महाराजांना अर्पण करता येऊ शकेल, तरी सर्व भाविक भक्तांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन श्रीक्षेत्र गाणगापूर येथे होणाऱ्या कार्यक्रमात आपला मौलिक सहभाग नोंदवावा ही विनंती

संपर्क नंबर ७४१०१७५१८९ ,९८३४४४५३७५
९५२७०५६१८९ , ९६२३१७७९९५

विनीत
गुरुतत्त्व प्रदीप

# मार्ग तालिका

| अ.क्र | दिनांक,वार | गावे | माध्यान्ह विश्राम | मुक्काम | किमी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २६/१०/२५ रविवार | कारंजा, मूर्तीजापुर, अकोला, शेगाव, खामगाव | मूर्तीजापुर | खामगाव | १४२ |
| २ | २७/१०/२५ सोमवार | खामगाव, नांदुरा, मुक्ताईनगर, भुसावळ, जळगाव | नांदुरा | जळगाव | १४० |
| ३ | २८/१०/२५ मंगळवार | जळगाव, अमळनेर, धुळे, मालेगाव, सटाणा | अमळनेर | सटाणा | १९० |
| ४ | २९/१०/२५ बुधवार | सटाणा, देवळा, कळवण, वणी, दिंडोरी, त्र्यंबकेश्वर | कळवण | ओझर | १६७ |
| ५ | ३०/१०/२५ गुरुवार | ओझर , त्र्यंबकेश्वर , नाशिक | नाशिक | नाशिक | १९ |
| ६ | ३१/१०/२५ शुक्रवार | पिंपळगाव(बसवंत), लासलगाव, विंचुर, येवला, कोपरगाव | येवला | वैजापुर | १४५ |
| ७ | ०१/११/२५ शनिवार | गंगापूर, दत्त देवगड, नेवासा, शेवगाव, पैठण- बीडकिन | नेवासा | छ.संभाजी नगर | १९० |
| ८ | ०२/११/२५ रविवार (एकादशी) | छ. संभाजीनगर, करमाड, बदनापूर | छ. संभाजीनगर | जालना | ६० |
| ९ | ०३/११/२५ सोमवार | जालना, परतूर, सृष्टी, मंजरथ, माजलगाव, मानवत | माजलगाव | मानवत / पाथरी | १७० |
| १० | ०४/११/२५ मंगळवार (वैकुंठ चतुर्दशी) | मानवत, सेलू ,जिंतुर, सेनगाव, रिसोड, वाशिम | जिंतुर | रिसोड/ वाशिम | १६४ |
| ११ | ०५/११/२५ बुधवार (पौर्णिमा) | वाशिम,कन्हेरगाव नाका ,हिंगोली, औंढा ,परभणी | औंढा | कारेगाव - जेवण परभणी | १२६ |
| १२ | ०६/११/२५ गुरुवार | परभणी, वसमत | नाष्टा व जेवण परभणी | वसमत | ४५ |
| १३ | ०७/११/२५ शुक्रवार | वसमत, असेगाव, नांदेड, भोकर | नांदेड | भोकर | ९० |
| १४ | ०८/११/२५शनिवार (चतुर्थी) | भोकर, मुदखेड,गोरठा, पेठ उमरी,करखेली, धर्माबाद | नाष्टा- भोकर चतुर्थी फराळ-गोरठा | जेवण- धर्माबाद मुक्काम - बासर | १११ |
| १५ | ०९/११/२५ रविवार | बासर, बिलोली, नर्सी, मुखेड, शिरूर ताजबन्द | नाष्टा -बासर जेवण - कासराळी | उदगीर | १५७ |
| १६ | १०/११/२५ सोमवार | उदगीर, लातूर, औसा, तुळजापूर | नाष्टा व जेवण लातूर | तुळजापूर | १४४ |
| १७ | ११/११/२५ मंगळवार | तुळजापूर,धाराशिव, कळंब, आंबेजोगाई, परळी | जेवण - धाराशिव | जेवण आंबेजोगाई मुक्काम - परळी | १४५ |
| १८ | १२/११/२५ बुधवार | परळी, सोनपेठ, शिरसाळा, तेलगाव, बीड | नाष्टा व जेवण परळी | बीड | १०९ |
| १९ | १३/११/२५ गुरुवार | बीड, जामखेड,कर्जत, श्रीगोंदा, शेडगाव | नाष्टा- बीड | शेडगाव | १५६ |
| २० | १४/११/२५ शुक्रवार | शेडगाव, श्रीगोंदा,अहिल्यानगर, सुपा, शिरूर, रांजणगाव , वाघोली | नाष्टा -पेडगाव जेवण अहिल्यानगर | वाघोली | १९० |
| २१ | १५/११/२५ शनिवार (एकादशी) (आळंदी यात्रा) | पुणे – कसबा गणपती, दगडूशेठ गणपती-दत्त मंदीर, श्रीशंकर महाराज मठ, विणकर सभागृह, सारसबाग गणपती, वासुदेव निवास,म्हातोबा मंदीर- कोथरूड,वारजे, शिवणे,नांदेड सिटी | नाष्टा- विणकर स. फराळ- म्हातोबा मंदिर | धायरी | २३ |
| २२ | १६/११/२५ रविवार | सुखीभवन चिंचवड, मोरया गोसावी मंदिर, निगडी, देहु, मोशी | चिंचवड | शिरवळ | १४३ |
| २३ | १७/११/२५ सोमवार | शिरवळ, सातारा, कराड, पलूस, औदुंबर | सातारा | जेवण व मुक्काम औदुंबर | १६० |
| २४ | १८/११/२५ मंगळवार | औदुंबर, आष्टा, पेठ वडगाव, कोल्हापूर, इचलकरंजी, शिरधोण | नाष्टा -औदुंबर जेवण - कोल्हापूर | नरसोबावाडी | १२५ |
| २५ | १९/११/२५ बुधवार | नरसोबावाडी, जयसिंगपुर, सांगली, मिरज, सांगोला | जेवण - सांगली | पंढरपूर | १६३ |
| २६ | २०/११/२५ गुरुवार | पंढरपूर,मोहोळ,सोलापूर अक्कलकोट,गाणगापूर | जेवण - सोलापूर | गाणगापूर | १७५ |
| | | | | | ३४४९ |